नमुना दोन

जा. क्र. जिपही/शिवीप्रा/शा.मा./664/२०२०.
शिक्षण विभाग (प्रा), जिल्हा परिषद हिंगोली.
दिनांक :-25 /08/२०२०.

प्रति,

प्राचार्य ,
पोदार इंटरनॅशनल स्कूल, गट क्र. १२
बळसोंड अकोला रोड खुराणा सावंत
इंजि. कॉलेज समोर हिंगोली..

विषय :- महाराष्ट्र बालकाचा मोफत व सक्तीचा शिक्षणाचा हक्क अधिनियम २००९ यांच्या कलम १८ च्या प्रयोजनार्थ, बालाकांना मोफत व सक्तीचा शिक्षणाचा हक्क नियम, २०११ याच्या नियम ११, पोट-नियम (४) अन्वये शाळांना मान्यता प्रमाण देण्याबाबत...

संदर्भ:-

१. महाराष्ट्र बालकाचा मोफत व सक्तीचा शिक्षणाचा हक्क अधिनियम २००९ यांच्या कलम १८
२. बालाकांना मोफत व सक्तीचा शिक्षणाचा हक्क नियम, २०११ याच्या नियम ११, पोट-नियम (४) अन्वये पोट-नियम (४) ३.
३. मुख्याध्यापक, पोदार इंटरनॅशनल स्कूल, गट क्र. १२ बळसोंड अकोला रोड खुराणा सावंत इंजि. कॉलेज समोर हिंगोली., दिनांक :- १३/०८/२०२०
४. गट शिक्षणाधिकारी,पंचायत समिती हिंगोली.यांचा तपासणी अहवाल पत्र दिनांक :- --निरंक --

आपल्या स्वयमुंल्याकनाच्या अर्जाच्या संदर्भात आणि त्यांनतर यासंदर्भात शाळेशी केलेल्या पत्रव्यवहार /शाळेची केलेली तपासणी याआधारे. **दिनांक :- ०१/०४/२०१९ पासुन दिनांक :- ३१/०३/२०२२ पर्यत (तिन वर्षाच्या) कालावधीसाठी** इयत्ता ०१ ली ते ०८ वी **करिता आपल्या शाळेस तात्पुरती मान्यता देत आहे.**

**वरील मान्यता ही खालील शर्तीच्या पुर्ततेच्या आधीन आहे.**

१. मान्यतेचा कालावधी वाढवुन मिळणार नाही आणी इयत्ता आठवीनंतर मान्यता किंवा सलग्नता देण्यास कोणत्याही परिस्थीतीत कोणतेही बंधन नसेल.
२. बालकांना मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिनियम, २००९ (जोडपत्र ए ) आणि महाराष्ट्र बालकांना मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क नियम, २०११ (जोडपत्र दोन) मधील तरतुदीचे शाळा पालन राहील.
३. शाळा नजीकच्या दुर्बल घटकातील आणि वंचित गटातील बालकांना, पहिल्या इयत्तेत, त्या इयत्तेतील विद्यार्थी संख्येच्या किमान २५% मर्यादेपर्यंत प्रवेश देईल आणि प्राथमिक शिक्षण पुर्ण होईपर्यंत त्यांना मोफत व सक्तीचे शिक्षण देईल परंतु आणखी, असे कि, पुर्व प्राथमिक इयत्तांच्या बांबतीत देखील या प्रमाणकाचे अनुपालन करण्यात येईल.
४. परिच्छेद ३ निर्दिष्ट केलेल्या बालकांकरिता शाळेला अधिनियमाच्या कलम १२ (२) नुसार प्रतिपुर्ती मिळेल, अशी परिपूर्ती मिळण्यासाठी शाळेला स्वतंत्र बँक खाते देण्यात येईल.
५. संस्था/शाळा कोणतीही कॅपिटेशन फी वसुल करणार नाही कोणत्याही छानणी पध्दतीसाठी बालकास किंवा त्याच्या/ तिच्या माता पित्यास किंवा पालकास भाग पाडणार नाही.
६. कोणत्याही बालकास वयाच्या पुराव्या अभावी, धर्म, जात किंवा वंश जन्मठिकाण किंवा यापैकी कोणत्याही कारणास्तव शाळेमध्ये प्रवेश नाकारण्यात येणार नाही.
७. (एक) शाळेस प्रवेश दिलेल्या कोणत्याही बालकास तो ज्या इयत्तत असेल त्याच इयतेत रोखुन टेवले जाणार नाही किंवा प्राथमिक शिक्षण पुर्ण होईपर्यंत शाळेतून काढून टाकण्यात येणार नाही.

(दोन) कोणत्याही बालकास शारीरीक शिक्षा किंवा मानसीक त्रास देण्यात येणार नाही.

(तीन) कोणत्याही बालकास प्राथमिक शिक्षण पुर्ण होईपर्यंत कोणत्याही मंडळाची परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक असणार नाही.

(चार) प्राथमिक शिक्षण पुर्ण केलेल्या प्रत्येक बालकास, नियम २३ अन्वये निर्धारित केलेल्या प्रमाणपत्र देण्यात येईल.

(पाच) विकलांग / विशेष गरजा असलेल्या विद्यार्थ्यांच्या अधिनियमाच्या तरतुदीनुसार समावेश करण्यात येईल.

(सहा) अधिनियमाच्या कलम २३ (१) अन्वये निर्धारित केलेली अर्हता धारण करणाऱ्या शिक्षकांची नियुक्ती करण्यात येईल. परंतु आणखी असे कि, अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकास किमान अर्हता धारण न करणाऱ्या शिक्षकांना अशी किमान अर्हता ५ वर्षाच्या कालावधीत संपादित करावी लागेल.

(सात) अधिनियमाच्या कलम २४ (१) मध्ये विनिर्दिष्ट केलेली त्यांची /तीची कर्तव्ये शिक्षा पार पाडतील, आणि

(आठ) शिक्षकांने /शिक्षीकेने खाजगी शिकवणीच्या कामात स्वताला गुंतवून घेऊ नये, याची सुनिश्चीती शाळा करिल.

८. शाळा समुचित प्राधिकाराने निर्धारित केलेल्या अभ्यास क्रमाच्या आधारे तयार केलेल्या पाठयक्रमाचे पालन करील.

९. शाळा, अधिनियमाच्या कलम १९ मध्ये विहित केल्याप्रमाणे शाळेत उपलब्ध असलेल्या सुविधांच्या तुलनेत विद्यार्थ्यांना प्रवेश देईल.

१०. शाळा अधिनियमाच्या कलम १९ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या मानकांचे व प्रमाणकांचे पालन करील.

११. मान्यता नसलेले वर्ग किंवा तुकडया, शाळेच्या परिसरात किंवा इतरत्र, चालविता येणार नाही.

१२. शाळेची इमारत किंवा इतर बांधकाम किंवा क्रिडांगण हे केवळ शिक्षणाच्या व कौशल्य विकासाच्या प्रयोजनार्थ वापरण्यात येतील.

१३. शाळा,सोसायटी नोंदणी अधिनियम, १९६० (१८६० चा २१) किंवा मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनिमय, १९५० अन्वये नोंदणी झालेल्या संस्थेमार्फत चालविण्यात येत आहे.

१४. शाळा कोणत्याही व्यक्तीच्या, गटाच्या वा व्यक्तीसंघाच्या किंवा इतर कोणत्याही व्यक्तीच्या फायद्याकरिता किंवा कोणताही नफा मिळविण्यासाठी चालविण्यात येत नाही.

१५. शाळेचे लेखे सनदी लेखापाला कडुन लेखापरिक्षित व प्रमाणित करुन घ्यावेत आणि नियमांनुसार योग्य लेखा विवरणपत्रे तयार करावीत. प्रत्येक लेखा विवरण पत्राची एक पत्र दरवषी जिल्हा शिक्षणाधिकारी यांचेकडे पाठविण्यात यावी.

१६. तुमच्या शाळेला मिळालेला मान्यता सांकेतांक (युडायस क्र. ) **२७१६०१००१७६** असा आहे, हा या कार्यालयाशी कोणताही पत्रव्यवहार करताना कृपया तो नमुद करावा, याची नोंद घ्यावी.

१७. शिक्षण संचालक /शिक्षणाणाधीकारी वेळोवेळी मागणी करतील असे अहवाल व माहिती शाळेने सादर करावी किंवा शाळेच्या मान्यतेच्या शर्तीची निरंतर पूर्तता करण्यासाठी किंवा शाळेच्या कामकातील त्रुटी दूर करण्यासाठी शासन किंवा स्थानिक प्राधिकारण देईल अशा सुचनाचे पालन करावे.

१८. संस्थेच्या नोंदणीचे कोणतेही असल्यास नूतनीकरण केल्याची सुनिश्चीती करावी.

शिक्षणाधिकारी (प्रा)
जिल्हा परिषद हिंगोली.

प्रतिलीपी :-

१. मा. शिक्षण उपसंचालक, औरंगाबाद विभाग औरंगाबाद यांना माहितीस्तव सविनय सादर.

२. अध्यक्ष, पोदार एज्यूकेशन ट्रस्ट पोदार सेंटर ८५, डॉ. आंबेडकर रोड परेल मुंबई. यांना माहितीस्तव व पुढील कार्यवाहीस्तव..

शिक्षणाधिकारी (प्रा)
जिल्हा परिषद हिंगोली.

जा. क्र. जिपही/शिवीप्रा/अस्था-3/खाप्रा/ 663 /2020.
शिक्षण विभाग (प्रा),जिल्हा परिषद हिंगोली.
दिनांक :- 25/08/2020.

प्रति,

अध्यक्ष /सचिव ,
पोदार एज्यूकेशन ट्रस्ट पोदार सेंटर ८5,
डॉ. आंबेडकर रोड परेल मुंबई

**विषय** :- महाराष्ट्र स्वंयअर्थसहाय्यीत शाळा (स्थपना व विनीयमन) अधिनीयम 2012 अंतर्गत स्वंयअर्थसहाय्यीत तत्वावर नविन शाळा स्थापन करणे, तसेच विद्यमान शाळेचा दर्जावाढ करण्यासाठी सन 2016-17 या शैक्षणीक वर्षात नविन खाजगी प्राथमिक स्वयं अर्थ सहाय्यीत /विना अनुदानीत/कायम विना अनुदानीत शाळा सुरु करण्यास खाते मान्यता देणे बाबत......

**संदर्भ** :-

1. महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यीत शाळा अधिनियम 2012 (सन 2013 चा 01)
2. शासन निर्णय क्र. एसएफएस-1016/प्र. क्र.172/एस.एम.-2 दिनांक :- 28/07/2016.
3. मा. शिक्षण उपसंचालक औरंगाबाद यांचे पत्र क्र. शिउसं/प्रावि-3/2016-17/30134/37 दिनांक :- 39/10/2016..
4. प्राचार्य, पोदार इंटरनॅशनल स्कूल, गट क्र. 12, बळसोंड, अकोला रोड, खुराणा सावंत इंजि. कॉलेज समोर हिंगोली. जि. हिंगोली. यांचे पत्र दिनांक :- 03/12/2019.
5. गट शिक्षणाधिकारी , पंचायत समिती हिंगोली. यांचा तपासणी अहवाल दिनांक :- --निरंक ----

खाजगी प्राथमिक स्वयंअर्थसहाय्यीत शाळेस परवानगी देण्याबाबत आपल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने कळविण्यात येते कि, खालील नमुद केल्याप्रमाणे आपल्या नावासमोर दर्शविलेल्या ठिकाणी व माध्यमातुन शैक्षणीक वर्षे 2016-17 मध्ये विहित अटिवर व खास करून खालील अटींची पुर्तता करण्याच्या धर्तीवर स्वंय अर्थ सहाय्यीत /कायम विना अनुदान तत्वावर (**माध्यम इंग्रजी** ) तत्वावर खाजगी स्वयं अर्थ सहाय्यीत प्राथमीक शाळा सुरु करण्यास संदर्भिय पत्र क्र. 01 ते 02 अन्वये मंजुरी दिली आहे. त्या प्रमाणे आपल्या संस्थेस खालील अटी व शर्तीस अधिन राहुन विवरण प्रपत्र अ मध्ये दर्शविलेल्या प्रमाणे प्राथमिक शाळा सुरु करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**अटी व शर्ती खालील प्रमाणे राहतील :-**

- प्राथमिक व उच्च प्राथमिकं शाळांनी बालाकांचा मोफत व सक्तीचा शिक्षणाचा संस्था सदरिल शाळा स्वंय अर्थसहाय्यीत तत्वावर /कायम विना अनुदान तत्वावर चालविण्यास आर्थिक दृष्टया सक्षम असली पाहिजे. संस्थेस स्वयं अर्थ सहाय्यीत शाळेसाठी शासनाने विहित केलेल्या नियमानुसार आणि मुंबई प्राथमिक शिक्षण नियमावली १९४९ मध्ये विहित केलेल्या अटिनुसार,.जागा,वर्ग खोल्या, शैक्षणिक साहित्य, इतर आवश्यक सुविधाची तव्दतच क्रिंडागण इत्यादींची सोय केली पाहिजे. तसेच शाळेसाठी विहित केलेल्या वयोमर्यादेतील प्रशिक्षित शिक्षक वर्ग मागासवर्गीय प्रमाणासह नेमला पाहिजे व त्यांना शासनाने विहित दराने वेतन व भत्ते दिले पाहिजेत.
- संस्थेने शासनाच्या वेळोवेळी निघणाऱ्या आदेशाचे उदा. वर्गातील विद्यार्थी तसेच इत्यादींचे काटेकोरपणे पालन करणे आवश्यक आहे.
- संस्थेने जवळपासच्या शाळेवर आपल्या शाळेमुळे कोणतेही दुष्परिणाम होणार नाहीत यांची दक्षता घेतली पाहिजे.
- संबधित संस्था मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम १९५० व संस्था नोंदणी अधिनियम १८६० या दोन्ही अधिनियमाखाली नोंदणी असावी.
- संस्थेविरुध्द गंभीर स्वरुपाच्या तक्रारी नसाव्यात.

- संस्थेने चालविलेल्या प्राथमिक शाळेपैकी एखाद्या शाळेची मान्यता काढुन घेतलेली नसावी.
- संस्थेने कोणत्याही प्रकारचे गैरव्यवहार चालत असल्याबाबतच्या तक्रारी नसाव्यात अथवा संस्थेने चालविलेल्या शाळा शासनाने ताब्यात घेण्याबाबत एखादे प्रकरण प्रलंबीत नसावे. संस्थेस शाळेची भाग शाळा काढता येणार नाही.संस्थेची आर्थिक परिस्थिती समाधानकारक असणे क्रमप्राप्त आहे.
- संस्थेने शाळा परवानगीसाठी मागणी केलेले माध्यम, शाळेचे ठिकाण इत्यादी मध्ये भविष्यात कोणताही बदल करता येणार नाही शासनाने ज्या ठिकाणासाठी शाळा परवानगी दिलेली आहे. त्या ठिकाणा व्यतीरीक्त अन्य ठिकाणी शाळा सुरु केल्यास शासनाने दिलेली परवानगी आपोआप रद्द होईल.
- परवानगी दिलेल्या स्वयंअर्थसहाय्यीत शाळेमध्ये शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांची भरती शासनाच्या प्रचलीत नियमानुसार व धोरणानुसार करणे बंधनकारक राहील.
- शासनाच्या वेळावेळी निर्गमित होणाऱ्या आदेशाचे व कार्यपध्दतीचे तसेच
- महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यीत शाळा (स्थापना व विनीयमन ) अधिनियम 2012 (सन 2013 चा 01) मधील सर्व तरतूदीचे पालन करणे बंधनकारक राहील.

वरिल सर्व अटि व शर्ती इत्यादीची पुर्तता संस्थेने तात्काळ नजिकच्या काळात करून घ्यावी. ज्या शाळा संस्था शासन नियमाचे तंतोतत पालन करित नसतील आणी अटी व शर्तीची पुर्तता करून घेणार नाही अश्या संस्थे विरुध्द नियमानुसार कार्यवाही करण्यात येईल यांची नोंद घ्यावी.

विवरण पत्र अ

शैक्षणीक वर्षे 2016-17 पासुन खाजगी प्राथमिक शाळांना खाते मान्यता द्यावयाच्या परवानगी बाबत.

| यादी क्र | संस्थेचे नाव | शाळेचे नाव व ठिकाण | शाळेचा प्रकार | माध्यम |
|---|---|---|---|---|
| 1 | पोदार एज्यूकेशन ट्रस्ट पोदार सेंटर 85. डॉ. आंबेडकर रोड परेल मुंबई. | पोदार इंटरनॅशनल स्कूल. गट क्र. 12. बळसोंड. अकोला रोड. खुराणा सावंत ईजि. कॉलेज समोर हिंगोली. | इयत्ता 1 ली ते 05 वी प्राथमिक ला जोडुन उच्च प्राथमिक (इ. 6 ते 8 वी ) | इंग्रजी |

शिक्षणाधिकारी (प्रा),
जिल्हा परिषद हिंगोली.

प्रतिलीपी :-

- मा. शिक्षण उपसंचालक औरंगाबाद विभाग औरंगाबाद. यांना माहितीस्तव.......
- गट शिक्षणाधिकारी. पंचायत समिती हिंगोली. यांना देवुन कळविण्यात येते कि. आपल्या कार्यक्षेत्रातील संस्था/शाळा विहित अटीची पुर्तता करित आहेत किंवा नाही याबाबत आढावा घेवुन अटीची पुर्तता करून घेण्यात यावी व शाळांची नियमित तपासणी करुन मार्गदर्शन करावे व वेळोवेळी शाळेस भेट देण्यात यावी.

शिक्षणाधिकारी (प्रा),
जिल्हा परिषद हिंगोली.